ePaper
**मान्सून आला रे आला! मुंबईत ऑरेंज अलर्ट!**

वर्ष - 7 । अंक -58 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 25 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**
- प्रवाशांच्या जीवाशी खेळ!
- सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'!

# खासदार श्रीरंग बारणेचं अजित पवार यांना आव्हान!

## मावळमध्ये पुन्हा एकदा ताकद लावून पाहावी, मावळमध्ये मीच जिंकणार

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना आव्हान दिलं आहे. अजित पवार यांनी मावळमध्ये पुन्हा एकदा ताकद लावून पाहावी, मावळमध्ये मीच जिंकणार असा विश्वास मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना आव्हान दिलं आहे.**



श्रीरंग बारणे म्हणाले की, मावळ मतदारसंघात पार्थ पवार यांचा मी २ लाख ५३ हजार मतांनी पराभव केला आहे. २०१४ असेल २०१९ असेल मी समोर कोण आहे हे बघितलं नाही. २०२४ च्या निवडणुकीतही मी मावळ मतदारसंघातून विजयी होईन. समोर कोण आहे याची मला चिंता नाही. मी जनतेतून काम करून मावळ मतदारसंघात वेगळा ठसा निर्माण केला असल्याचं बारणे म्हणाले.

उद्धव ठाकरे हे चांगला माणूस आहेत. पण संजय राऊतांनी त्यांचे राजकारण संपवलं आहे. उद्धव ठाकरेंची प्रतिमा मलिन करण्याचं काम संजय राऊतांनी केलं आहे. राजकारणाला न शोभणारी व्यक्ती संजय राऊत करत आहे. हिंदुत्वाचा खरे वारसदार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. ते अतिशय प्रभावीपणे राज्यात काम करत आहेत, असं श्रीरंग बारणे म्हणाले.

देशभरात सगळे विरोधी पक्ष एकत्र आले तरी २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा केंद्रात भाजपचे एनडीएचं सरकार येणार आहे. पुन्हा मोदी पंतप्रधान होणार आहेत. हे सगळे पक्ष एकत्र आले तरी त्यांचा विचार जुळत नाही. ते प्रत्येताचे काम ओढण्याचे काम करत आहेत.

### समोर कोण याची मला चिंता नाही

»मावळ लोकसभा मतदारसंघात पार्थ पवार यांचा मी 2 लाख 53 हजार मतांनी पराभव केला आहे. 2014 असेल 2019 असेल मी समोर कोण आहे हे बघितलं नाही. 2024 च्या निवडणुकीतही मी मावळ मतदारसंघातून विजयी होईल असा विश्वास बारणेंनी व्यक्त केला. समोर कोण आहे याची मला चिंता नाही. मी जनतेतून काम करुन मावळ मतदारसंघात वेगळा ठसा निर्माण केल्याचे बारणे म्हणाले.

### जागावाटपाबाबतचा निर्णय झाला आहे

»देशभरातील सगळे विरोधी पक्ष एकत्र आले तरी 2024 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा केंद्रात भाजपचे एनडीएचं सरकार येणार आहे. पुन्हा एकदा नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार आहेत. हे सगळे पक्ष एकत्र आले तरी त्यांचा विचार जुळत नसल्याचे बारणे म्हणाले. ते प्रत्येकाचे काम ओढण्याचे काम करत आहेत. 2024 ची निवडणुकीत आणखी बरीच स्थित्यंतरी होतील. पण या देशातील जनता विकासाला महत्व देईल असे बारणे म्हणाले. जागावाटपाबाबत गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घेतला आहे.

# मुलांना नोकरी मिळणारे नव्हे, नोकरी देणारे बनवा!

## गायत्री ग्रुप ऑफ स्कूलचे संस्थापक विनायक भोंगाळे यांचे मत : 'पालक मार्गदर्शन' उपक्रम उत्साहात

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मजबूत पाया तयार करण्यासाठी प्रेम आणि काळजीने पालनपोषण करण्याच्या विविध मार्गांचा पालकांनी अभ्यास केला पाहिजे. मुलांना केवळ नोकरी करणारे नाही, तर नोकरी देणारे बनवले पाहिजे, असा संदेश गायत्री ग्रुप ऑफ स्कूलचे संस्थापक अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी दिला.**



भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे सभागृहात स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, गायत्री ग्रुप ऑफ स्कूलनेच्या वतीने "पालक मार्गदर्शन अभिमूखता" कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये श्री. भोंगाळे बोलत होते. यावेळी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे कदू पाटील आणि विश्वस्त सरिता विखे पाटील, सचिव संजय भोंगाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी केलेल्या गणेश वंदना व राम शिंदे यांनी सादर केलेल्या विठुरायाच्या मधुर भजनाने झाली. मोशी व चऱ्होली शाखेच्या इयत्ता १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांचे पालक, शिक्षक व पालक प्रतिनिधी यांच्यासमवेत करण्यात आला.

अंजली भागवत यांनी पालक आणि शिक्षक यांच्यातील प्रभावी संवादाच्या फायद्यांविषयी विस्तृतपणे सांगितले. शाळेतील मुलांना उत्तम शिक्षण आणि वाढीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पालकांकडून सहाय्य आणि सूचना मागितल्या आणि चांगल्या पालकत्वासाठी काही मार्गदर्शक तत्वे सांगितली.

# प्रवाशांच्या जीवाशी खेळ!

## » असुरक्षित पीएमपी बसला फिटनेस प्रमाणपत्र दिल्याचा 'आप'चा दावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**असुरक्षित पीएमपी बसला फिटनेस प्रमाणपत्र दिल्याचा आम आदमी पक्षाने दावा केला आहे. याप्रकरणी आरटीओ अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जाणार आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) अनेक बसच प्रवाशासाठी सुरक्षित नसतानाही त्या बसला प्रादेशिक परिवहन विभागाचे (आरटीओ) फिटनेस प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आले आहे. नादुरुस्त बसला अधिकाऱ्यांनी फिटनेस प्रमाणपत्र कसे दिले, असा प्रश्न आम आदमी पक्षाने उपस्थित केला आहे. याप्रकरणी आरटीओ अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जाणार आहे.**



पीएमपीच्या सात डेपोमधील १५० बसची आपच्या टीमने पाहणी केली. या पाहणीत प्रथोमचार किट, अग्निशमन यंत्रणा, दारे व्यवस्थित उघडतात, का अशा पंधरा मुद्द्यांवर पाहणी करण्यात आली. त्या वेळी पीएमपीच्या अनेक बसची दयनीय अवस्था असल्याचे दिसून आले. अनेक बसमध्ये प्रथमोपचार किट नाही, अपघात झाल्यास काच तोडणारा हातोडा नाही, अग्निशामक यंत्रे बंद आहेत, सीट कुशन गायब आहे, बसच्या चालकाला सीट ही आरामदायी नाही, अशा अनेक प्रवाशांच्या दृष्टीकोनातून असुविधा आढळून आल्या. प्रवाशांसाठी या बस सुरक्षितता नसताना त्या रस्त्यावर आणल्या जात आहेत. तपासणी वेळी बसला आरटीओकडून फिटनेस प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे आढळून आले. तपासणी केलेल्या अनेक बस नादुरुस्त असताना ही त्यांना आरटीओचे फिटनेस प्रमाणपत्र होते. अलीकडे पीएमपी बसचे ब्रेक डाउनचे वाढत आहे. त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे नादुरुस्त बसला फिटनेस प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी म्हणून आरटीओकडे मागणी केली जाणार असल्याचे आपच्या प्रवासी आघाडीचे अध्यक्ष चेंन्थिल अय्यर यांनी सांगितले.

### बसच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष

**»पीएमपीच्या बसची पाहणी केली असता बसची देखभाल दुरुस्ती व्यवस्थित केली जात नसल्याचे आढळून आले. नादुरुस्त बस रस्त्यावर आणून जाणूनबुजून खराब ठेवल्या जातात. नवीन बस खेरदीसाठी टेंडर काढता यावे म्हणून असा प्रकार केला जात असल्याचा आरोप 'आप'ने केला आहे.**

### 'प्रत्येक जण एक तपासा' मोहीम

**»पीएमपी मधील भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यात आता आम्ही लोकांना सहभागी करून घेणार आहोत. यासाठी आम्ही 'प्रत्येक जण एक तपासा' या नवीन मोहिमेची घोषणा करत आहोत. 'आप'ने दिलेल्या १५ मुद्द्यांच्या आधारे नागरिक बसची तपासणी करू शकतात. बस क्रमांक व छायाचित्रासह हा तपशील आपच्या ८४८४ ८७४०७४ या क्रमांकावर व्हॉट्स ॲप पाठवावा, असे आवाहन आपच्या प्रवासी आघाडीचे अध्यक्ष चेंन्थिल अय्यर यांनी केले आहे.**

---

# रेल्वेच्या 'अहिल्ये 'ची कोटींची कमाई!

## » तिकीट तपासनीस महिलांची विशेष कामगिरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यामध्ये विना तिकीट प्रवास करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी भरारी पथक सुरू करण्यात आले होते. याच पथकातील महिला टीसीने, रेल्वेला आर्थिक वर्षातील सर्वात जास्त उत्पन्न मिळवून दिले आहे. पुणे रेल्वे विभागातील तिकीट तपासनीसांच्या (टीसी) 'अहिल्या पथका'तील महिलेने गेल्या आर्थिक वर्षात ९७ लाख ५५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवून दिले आहे. पुणे विभागात महिला तिकीट तपासनीसाने मिळवून दिलेले हे सर्वाधिक उत्पन्न आहे.**



एम. पी. चाकणे असे सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या तिकीट तपासनीस महिलेचे नाव आहे. त्या पुणे रेल्वे विभागात टीसीच्या भरारी पथकात काम करतात. त्यांनी गेल्या वर्षात २९० दिवस काम केले होते. पुणे विभागातून धावणाऱ्या रेल्वेतील विना तिकीट प्रवास करणाऱ्यांचा शोध घेण्याचे काम भरारी पथकाकडून केले जाते. या पथकात चाकणेंसोबत रुपाली माळवे, रुपाली नाशिककर काम करतात. गेल्या आर्थिक वर्षात या तिघींनी रेल्वेला दोन कोटी आठ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवून दिले आहे. त्यामध्ये चाकणे यांचा वाटा ९७ लाख ५५ हजारांचा आहे. पुणे रेल्वे विभागात एकूण ३२ महिला टीसी आहेत. त्यापैकी तीन महिला भरारी पथकात, नऊ महिला उपनगरात धावणाऱ्या लोकल टीसीचे काम करतात. तर, काही प्रवासी चार्ट घेऊन कोचनुसार तपासणीचे काम करतात. पूर्वी १२ महिला टीसी केवळ उपनगरात धावणाऱ्या गाड्यांमध्ये तिकीट तपासनीसांचे काम करीत होत्या.

पुणे रेल्वे विभागाचे वाणिज्य व्यवस्थापक डॉ. रामदास भिसे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर उत्पन्न कसे वाढविता येईल, अशी विचारणा त्यांनी महिला तिकीट तपासनीसांना केली होती. 'उपनगरात धावणाऱ्या गाड्यांमध्ये टीसीचे काम करीत असल्याने उत्पन्न कमी आहे.

> पुणे लोकलमध्ये तिकीट तपासनीसांचे काम करणाऱ्यांना महिलांचे उत्पन्न कमी होते. त्यांना उत्पन्न वाढविण्यासाठी विचारणा केली. त्यांच्या मनाप्रमाणे भरारी पथक तयार करून सर्व रेल्वे गाड्यांमध्ये तपासणीचे काम दिले. त्यामुळे या पथकातील महिला तिकिट तपासनीसांनी आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न मिळवून दिले आहे. येत्या वर्षात एक कोटीपेक्षा जास्त उत्पन्न मिळवून देण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.
>
> **- डॉ. रामदास भिसे,** वाणिज्य व्यवस्थापक, पुणे रेल्वे विभाग

सर्व गाड्यांमध्ये तिकीट तपासणी करण्यास मोकळीक दिल्यास उत्पन्नामध्ये वाढ होईल,' असे त्यांनी सांगितले. त्यानुसार चाकणे व इतर दोघींचे भरारी पथक तयार करून त्यांना सर्व रेल्वे गाड्यांमध्ये तिकिट तपासणी करण्याचे अधिकार देण्यात आले.

---

## डोळ्यात मिरची पूड टाकून पत्रकारावर गोळीबार; पुण्यातील त्या घटनेतील सूत्रधार जाळ्यात

।पुणे। महाईन्यूज ।



जमिनीच्या व्यवहारातील वादातून पत्रकारावर गोळीबार केल्याप्रकरणी मुख्य आरोपीला पोलिसांनी बेंगळुरूमधून अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत सहा अल्पवयीन मुलांसह १३ जणांना स्वारगेट पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जमिनीच्या व्यवहारातील वादातून पत्रकारावर गोळीबार केल्याप्रकरणी मुख्य आरोपीला पोलिसांनी बेंगळुरूमधून अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत सहा अल्पवयीन मुलांसह १३ जणांना स्वारगेट पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जमिनीच्या आर्थिक व्यवहारातून जीवे मारण्याची सुपारी देऊन गुन्हा घडल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

श्रेयस अप्पा मते (वय २१, रा. नांदेड, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. मते याला ताब्यात घेऊन पोलिसांचे पथक शनिवारी पुण्यात पोहोचले. मते आणि त्याच्या साथीदारांनी सुपारी घेऊन हल्ला केला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. प्रथमेश उर्फ शंभू धनंजय तोडे (वय २०, रा. दत्तवाडी) आणि अभिषेक शिवाजी रोकडे (वय २२, रा. नांदेड) अशी यापूर्वी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

शहरातील एका दैनिकाच्या उपनगर वार्ताहरावर ११ जून २०२३ रोजी स्वारगेट भागातील महर्षीनगर परिसरात गोळीबार करण्यात आला होता. त्यापूर्वी डोळ्यात मिरची पूड टाकून मारहाण करण्याचा प्रयत्न झाला होता. सिंहगड रस्त्यावरील जमिनीच्या वादातून हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती तपासात मिळाली आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी मते याच्याविरुद्ध यापूर्वी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होता.

# सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा ‘मास्टर प्लॅन’!

## पाणी, कचऱ्यासह अन्य समस्या कायमस्वरूपी सोडवण्याचा निर्धार

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायटी धारकांना भेडसावणारे प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन ‘मास्टर प्लॅन’ तयार करणार आहे. त्यासाठी सोसायटीधारक, बांधकाम व्यावसायिक आणि लोकप्रतिनिधी अशी संयुक्त बैठक घेवून आराखडा तयार करण्यात येईल, असे आश्वासन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील सोसायटीधारक आणि समाविष्ट गावांतील पाणी समस्यांबाबत आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी व महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची बैठक झाली. सोसायटीधारकांच्या विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे आणि पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार लांडगे यांनी सोसायटीधारकांच्या समस्यांबाबत लक्षवेधी सादर केली होती. सदनिका हस्तांतरण, सोसायटी हस्तांतरण आणि बांधकाम व्यावसायिकांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे सर्वसामान्य सोसायटीधारकांना सहन करावा लागणारा नाहक त्रास याबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यापार्श्वभूमीवर पुन्हा एकदा आयुक्त शेखर सिंह यांनी पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी धोरणात्मक आराखडा तयार करण्याची तयारी केली आहे. त्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल. त्याद्वारे सोसायटीधारक प्रतिनिधी, फेडरेशनचे प्रतिनिधी, महापालिका अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक प्रतिनिधी यांची समिती गठीत करुन प्रकल्प किंवा सोसायटी हस्तांतरण करताना घ्यावयाची काळजी आणि नियम व अटी-शर्ती तयार करण्यात येतील. ज्यामुळे भविष्यात सोसायटीधारक आणि बांधकाम व्यावसायिक यांच्यामध्ये वादाचा प्रसंग उद्भवणार नाही.

### आमदार महेश लांडगे, सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी यांची बैठक

### पाणीपुरवठ्यातील ठेकेदारी बंद करा...

**पाणी पुरवठ्याबाबत ठेकेदार नियुक्ती केली जाते. ठेकेदार आणि बांधकाम व्यावसायिक यांचे लागेबांधे आहेत. त्यामुळे कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जाते. याला महापालिका अधिकारीही सामील आहेत, अशा तक्रारी येत आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पाणी पुरवठ्याबाबत नियोजनात होणारी ठेकेदारी बंद करावी. प्रशासकीय पातळीवर समान पाणीपुरवठा धोरण अवलंबावे. ज्यामुळे विशिष्ट भागातील नागरिकांना पाणी समस्याचा त्रास सहन करावा लागणार नाही, अशा सूचना आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत.**

---

# मोदी सरकारच्या काळात कल्याणकारी योजनांना प्रोत्साहन!

## केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे मत; श्रीक्षेत्र आळंदी येथे भाजपाची जाहीर सभा

।आळंदी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**केवळ भारतातच नव्हे, तर अमेरिका, चीनसह परदेशात मोदींचा करिष्मा निर्माण झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष भारताच्या लोकशाहीचे कौतूक करतात. मात्र, काँग्रेसचे नेते राहुल गांधी भारताची लोकशाही धोक्यात आहे, असे परदेशात सांगतात. त्यामुळे विरोधकांची खोड जाणार नाही. पण,  देशातील शेतकरी, दिनदुबळे, सर्वसामान्य नागरिकांसाठी समर्पित सरकार आहे, अशी घोषणा २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी केली. त्यानुसार गेल्या ९ वर्षांत लोकहितासाठी केंद्र सरकार काम करीत आहे, असे मत केंद्रीय मंत्री रावसाहेब दावने यांनी व्यक्त केले.**



श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथे शिरूर लोकसभा मतदार संघातील ‘‘मोदी@9 महा-जनसंपर्क अभियान’’ अंतर्गत केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जाहीर सभा झाली. यावेळी जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, आळंदीच्या माजी नगराध्यक्षा वैजयंती उमरगेकर, समन्वयक ॲड. धर्मेंद्र खांडरे, विस्तारक श्रीकृष्ण देशमुख, विधानसभा निवडणूक प्रमुख अतुल देशमुख, प्रदीप कंद, आशा बुचके, जयश्री पालांडे, योगेश टिळेकर, विकास डोळस, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे-पाटील, सरचिटणीस विजय फुगे यांच्यासह खेड, जुन्नर, आंबेगाव, मंचर, हडपसर आणि भोसरी विधानसभा मतदार संघातील सर्व मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

केंद्रीय मंत्री दानवे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे कोविडच्या महामारीत जगभरातील देशांमध्ये सर्वाधिक लोकसंख्या असतानाही मृत्यूचे प्रमाण सर्वात कमी भारतात राहीले.  कोविड प्रतिबंधक लस निर्माण करुन संपूर्ण जगाला लस पुरवठा केला आणि भारतातील प्रत्येक नागरिकाला मोफत लस उपलब्ध केली. देशातील ८० कोटी लोकांना धान्य उपलब्ध केले. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी १३ वर्षे काम केले. देशात ‘गरिबी हटाओ’ असा नारा दिला. मात्र, गरिबी हटली नाही. मोदी सरकारच्या काळात गोरगरिबांसाठी कल्याणकारी योजना हाती घेण्यात आल्या. यावेळी आळंदी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष सोमनाथ वाहिले यांनी भाजपात प्रवेश केला.

### कोविड लस घेतलेला प्रत्येक नागरिक ‘लाभार्थी’ : आमदार लांडगे

**आमदार महेश लांडगे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकारने गेल्या नऊ वर्षांत केलेली विकासकामे आणि कल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. भाजपाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना होत आहे, याची प्रचिती ‘मोदी@9 महा-जनसंपर्क अभियान’ दरम्यान येत आहे. कोविड महामारीमध्ये मोफत लस दिल्यामुळे नागरिकांमध्ये मोदी सरकारने ‘संजीवनी’ दिल्याची भावना निर्माण झाली आहे. ज्या भारतीय नागरिकाने कोविड लस घेतली आहे. तो प्रत्येक व्यक्ती मोदी सरकारच्या चांगल्या निर्णयांचा लाभार्थी आहे, असा विश्वासही लांडगे यांनी व्यक्त केला.**




**राष्टवादी काँग्रेस पार्टीच्या वर्धापन दिन सोहळ्यात पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधीपक्ष नेते अजित दादा पवार यांनी चांगलीच बॅटिंग केली. आपल्या मागून आलेल्या काही प्रादेशिक पक्षांनी स्वबळावर विविध राज्यात सत्ता हस्तगत केली मात्र आपण अजूनही ते यश का प्राप्त करू शकलो नाही अशी खंत त्यांनी व्यक्त करून पक्षाचे काहीतरी चुकतेय याकडे अंगुलीनिर्देश केला. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर मला विरोधी पक्षनेत्यांच्या जबाबदारीतून मुक्त करा आणि पक्षात जबाबदारी द्या , बघा कसे सगळे सरळ करतो अशी भावना व्यक्त केली.**

# अजित दादांची वेदना...

पक्षातील अनेक आघाड्यातील पदे रिक्त आहेत ,युवक काँग्रेस मधील युवक प्रौढ झाले तरी त्याच पदांवर कायम राहतात यात कोणाचे हित दडलेले आहे असाही सवाल त्यांनी करून सर्वांना चकित केले आहे. अजित दादा रोखठोक बोलण्यात प्रसिद्ध आहेत,त्यांना छक्केपंजे चालत नाहीत पक्षात जे काही शालेय ते निमूटपणे सहन करणे त्यांच्या स्वभावात नाही.

अजित दादांनी ज्या भावना जाहीरपणे व्यक्त केल्या त्या अनेकांच्या आहेत मात्र योग्य व्यक्तीने योग्य ठिकाणी त्या व्यक्त केल्याचे समाधान आता व्यक्त केले जात आहे. दादांचा त्रागा रास्त आहे कारण गेल्या १० वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या आम आदमी पार्टीने दिल्लीत तिसऱ्यांदा आणि पंजाबात यावेळी एकट्याच्या बळावर सत्ता काबीज केली आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता दीदींनी आणि आंध्रमध्ये तोच प्रयोग जगनमोहन रेड्डीनी केला आहे. या सगळ्यांची उदाहरणे देऊन अजित



दादांनी पक्षातील दिग्गज आणि धोरण कर्त्यांना सवाल केला आहे की राष्ट्रवादी काँग्रेस बाबत हे का घडू शकले नाही ? गेली सत्तावीस वर्षे पक्ष देशभर काम करीत आहे आणि आपापल्या जिल्ह्यात प्रभावी पकड असणारे असंख्य नेते पक्षात कार्यरत आहेत तरीही पक्षाला एकहाती यश का मिळत नाही ही दादांची चिंता सर्वांना विचारात टाकणारी म्हटली पाहिजे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत गेली अनेक वर्षे तगडे नेते काम करतात मात्र पक्षासाठी काम करताना आखडता हात घेतात असा आजवरचा अनुभव आहे. या पक्षात प्रामुख्याने सहकार क्षेत्रात काम करणारे आणि ज्यांच्या अनेक सहकारी संस्था आणि विविध शाळा,कॉलेज आहेत अश्या नेत्यांचा भरणा अधिक आहे. कोणताही सहकार नेता उघडपणे राजकीय वैर घेऊन पक्षाचे काम करीत नसतो हा आजवरचा अनुभव आहे. स्वतःच्या सहकारी संस्था कायम हातात ठेवण्यासाठी जेवढा आटापिटा केला जातो तेवढी मेहनत पक्षासाठी घेताना हे नेते दिसत नाहीत हे वास्तव आहे. वर्षानुवर्षे जुने नेते किंवा त्यांचे वारस पक्षातील महत्वाच्या पडणं वेटोळे मारून बसले आहेत त्यामुळे नव्यांना काम करण्यास अजिबात संधी नाही,कुणी नवा त्या पदावर आला तर काही महिन्यात निष्क्रिय होऊन घरी कसा बसेल याची फिल्डिंग लावण्यात हेच नेते पटाईत असतात त्यामुळे नेत्यांच्या गर्दीने या पक्षावर सूज आली आहे मात्र विजयासाठी लागणारी सुदृढता त्यांच्याकडे नाही हे वारंवार सिद्ध झाले आहे.

आपण जणू सत्तेवर बसण्यासाठीच जन्माला आलो आहोत असा गैरसमज अगदी जिल्हा पातळीवरील नेत्यांना झाला असल्यामुळे विरोधी पक्षाचे नेमके काम काय असते याचा सगळ्यांना विसर पडला आहे. जनतेत कुठलीही प्रतिमा नसणाऱ्या केवळ मुंबईत नेत्यांच्या बॅगा उचलून नियमित नेत्यांचे मुखप्रक्षालन करणाऱ्या बाजार बुणग्यांची अनेक पदांवर भरती करण्यात आली आहे. सत्तेच्या काळात ज्यांना पक्षाने विविध कारणांनी ताकद दिली ते जमा केलेल्या धनाची विल्हेवाट लावण्यात मश्गुल आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हेच नेते सामान्य उमेदवारीसाठी पैसा खर्च करण्यात कुचराई करतात उलट उमेदवारालाच प्रचारासाठी गाडी पाठवून हे टोपणजी मतदार संघात मिरवावे लागतात अशी वाईट अवस्था या पक्षाची झालेली आहे. पक्षातील सेवादल सारखी अत्यंत महत्वाची आघाडी या कर्मदरिद्री पणामुळे बंद पडली आहे.

गावपातळीवरील कार्यकर्ते सोडा खुद्द नेत्यांना आता पक्षाकडून काहीही अपेक्षा राहिली नसल्याचे निराशाजनक वातावरण प्रत्येक जिल्ह्यात निर्माण झाले आहे. पदाधिकारी आणि जनता यांचा संपर्क तुटला आहे ,लोकांच्या प्रश्नावर आंदोलने सोडाच ,घरातून बाहेर पडावे असे अलीकडे नेत्यांना वाटत नाही. राजकारण हे पैसा उपसण्याचे माध्यम असल्याचे ज्यांना वाटते अशाना प्रदेश स्तरावरून अधिक महत्व दिले आहे त्यामुळे निम्मे महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार इतरांकडे सरकला आहे. दादांनी ज्यांची उदाहरणे दिली ते आप, तृणमूल किंवा बीआरएस पक्ष संघटन वाढीसाठी कोणत्या पातळीवर परिश्रम करतात याचा नेत्यांनी अभ्यास करण्याची गरज आहे. काल ,परवा आलेल्या भारत राष्ट्र समितीने जर याच राज्यात ३० लाखांवर सभासद नोंदणी केली असेल तर पक्षाकडून आजवर मलिदा घेतलेले गब्बर नेते काय करीत आहेत याचा जाब सुद्धा दादांनी जिल्हावार दौरा करून स्थानिक नेत्यांना विचारला पाहिजे.

## संपादकीय »

### गोंधळलेले महाराजकारण

***भारत आणि अमेरिका यांचे संबंध शीतयुद्ध संपल्यानंतर गेली तीन दशके क्रमाक्रमाने सुधारत चालले आहेत. भारतातील एनडीए आणि यूपीए या दोन्ही सरकारांनी अमेरिकेशी संबंध सुधारण्यास महत्त्व दिले आहे.***

'राजकारण हे बदमाशांचे शेवटचे आश्रयस्थान आहे' अशी एक म्हण आहे. पण याच राजकीय आखाड्यात चांगले जाणते लोक बालिशपणा करताना दिसतात. एरवी लोक त्यांच्या अशा वागण्याकडे एक वेळ दुर्लक्ष करतील, पण लोकांनी भरलेल्या करांच्या पैशातून राजकारण्यांचा हा सगळा खेळ चालत असेल, तेव्हा मात्र करदात्याला त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. स्वत:ला 'शूरवीर' समजणारे आणि गेले वर्षभर मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राचा कारभार हाकणारे एकनाथ शिंदे बहुचर्चित महानगरपालिका निवडणुकीच्या आणि अर्थातच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रतीक्षेत आहेत. आपले वेगळे स्थान निर्माण करण्यासाठी ते आणि त्यांची ४० माणसे ठाकरेंच्या शिवसेनेतून बाहेर पडली तेव्हा आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळेल याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती.

**समाजकल्याण विभागाकडून जागतिक रँकिंग ३००च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठांमध्ये, तर इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे जागतिक रँकिंग २००च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी व पीएचडीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते. त्यामध्येही एकसमानता हवी, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.**

## समलैंगिक पालकत्वाची गुंतागुंत

स्पॅनिश कवयित्री इव्हा बाल्तसार यांची 'बोल्डर' ही गेल्या वर्षी इंग्रजीत अनुवादित झालेली कादंबरी. मूल स्पॅनिश भाषेत असलेल्या या कादंबरीचा इंग्रजीत अनुवाद जुलिया सॅन्से यांनी केला आहे. या कादंबरीची 'बुकर' आंतरराष्ट्रीय पुरस्काराच्या २०२३च्या दीर्घ यादीत निवड झाली आहे. त्यांची पहिली कादंबरी 'परमाफ्रॉस्ट'मधील भाषा स्पष्ट आणि उपरोधिक असली, तरी त्यापेक्षाही काकणभर जास्त धीट भाषेचा वापर 'बोल्डर' या कादंबरीत आहे.

समलैंगिक जोडपे म्हटले, की ते दिवसभर प्रणयधुंद असतात, असे दाखवले जाते. त्यांनाही पोट-पाणी आहे, त्यासाठी त्यांनाही कामधंदा करावा लागतो. संसारिक जबाबदारी त्यांच्याही खांद्यावर असते. त्यांनाही पालक व्हावेसे वाटते. 'बोल्डर'ची भाषा अत्यंत धीट, सडेतोड, तर काही ठिकाणी शिवराळ आहे. बोल्डर ही बाविशीतली भटकी (नॉर्मेडिक) तरुणी आहे. व्यवसायाने ती उत्तम आचारी आहे. समसा नावाच्या एका तरुणीशी, एका बेटाच्या बंदरावर बोल्डरची भेट होते. बोल्डर आपले घर सोडून त्या बेटावर राहायला आलेली असते. ती समसाच्या प्रेमात पडते. दोघीही एकमेकींचा यथेच्छ सहवास उपभोगतात. असे सर्व छान छान सुरू असताना, एक-दोन वर्षांनंतर बोल्डरचे आयुष्य महत्त्वाचे वळण घेते. समसाला आई व्हावेसे वाटते! समसाच्या या निर्णयाचा फार गंभीर परिणाम बोल्डरवर होतो. तिला कोणतेही बंधन नको असते. समसा आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे गर्भधारणा करवून घेते. बोल्डरला हा निर्णय फार पटलेला नसतो.



समसा एका मुलीला जन्म देते; तिचे नाव टीना. टीनाच्या जन्मानंतर बोल्डरला या नात्यात खूपच असुरक्षितता वाटू लागते. बोल्डरला टीना ही समसाच्या प्रेमात आलेली वाटेकरी वाटू लागते. बोल्डर टीनाचा द्वेष करीत नाही; पण तिला तिच्याविषयी ममत्वही वाटत नाही. अशा दोन परस्परविरुद्ध भावनांच्या कात्रीत ती सापडते. बोल्डर ही कोंडी फोडण्यास असमर्थ आहे. कोंडीत सापडल्यामुळे तिला समसासोबत राहणे, संसारिक जबाबदाऱ्या उचलणे, नाही तर समसाचे घर सोडून पूर्वीचे भटके जीवन पुन्हा सुरू करणे, यांपैकी एकाची निवड करणे भाग असते. आपल्या जीवनात बोल्डर एक निर्वात पोकळी अनुभवते. समसाच्या येण्याने तिला जो आनंद झालेला असतो, तिला जे हलके वाटू लागलेले असते, त्याची जागा आता जडपणा घेतो. एखाद्या पुरुष पतीप्रमाणे जबाबदाऱ्या उचलाव्यात, अशी समसाची अपेक्षा असते. एका ठिकाणी वैतागून बोल्डर म्हणते, 'सेक्स ही सर्वांत सोपी; पण असत्य गोष्ट आहे. ज्या गोष्टीला आपण आत्मा म्हणतो आणि जी गोष्ट प्रेमाच्या सामायिक कक्षेत राहते असे वाटते, ती गोष्टही खरी नाही.'

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पंकजा मुंडेंना MIM ची ऑफर?

## » ओवैसींचा मोठा दावा; पंतप्रधान मोदी यांनाही खोचक टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव ( केसीआर ) यांनी आपला पक्ष भारत राष्ट्र समितीला ( बीआरएस ) देशभरात नेण्याचं ठरवलं आहे. त्याला महाराष्ट्रातून सुरूवात झाली आहे. राज्यातील अनेक माजी आमदार-खासदारांसह मोठ्या नेत्यांनी बीआरएस पक्षात प्रवेश केला आहे. भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनाही बीआरएसने मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली आहे. यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. अशातच एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी मोठा दावा केला आहे.**



“बीआरएसच्या आधी दोन वर्षापूर्वीच इम्तियाज जलील यांनी पंकजा मुंडेंना एमआयएममध्ये येण्याची ऑफर दिली होती. पंकजा मुंडेंना याचा विचार करण्याची गरज आहे. प्रत्येकजण आपला पक्ष वाढवू शकतात. हा लोकशाहीने दिलेला अधिकार आहे,” असं असदुद्दीने ओवैसी यांनी सांगितलं.

“पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेत गेले. त्यामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध अधिक दृढ होतील. तसेच, विद्यार्थ्यांच्या व्हिसाचा प्रश्न लवकर सुटेल, अशी अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी अमेरिकेत असताना माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी सांगितलं की,‘भारतात अल्पसंख्याक मुस्लिमांना लक्ष्य केलं जातं आहे. यामुळे भारताचे नुकसान होईल.’ हे ते बराक ओबामा आहेत, ज्यांना पंतप्रधानांनी हाताने चहा पाजला,” असा टोला ओवैसींनी मोदींना लगावला आहे. “अमेरिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदा प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांना सामोरे गेले. अन्यथा आपल्या आवडीच्या निवेदकांना बोलवून मुलाखती देतात,” असा टोमणाही ओवैसींनी मोदींना मारला आहे.

### पंकजा मुंडे बीआरएस पक्षात जाणार?



»तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचा भारत राष्ट्र समिती हा पक्ष महाराष्ट्रात पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे. गेल्या काही दिवसांपासून विविध राजकीय पक्षांमधील नाराज नेत्यांना बीआरएसने आपल्या पक्षात घेतलं आहे. दरम्यान, भाजपा नेत्या पंकजा मुंडे या पक्षावर नाराज असल्याची चर्चा गेल्या काही वर्षांपासून आहे. त्यामुळे बीआरएसने पंकजा मुंडे यांनी पक्षात येण्याची आणि मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली आहे. पंकजा मुंडे बीआरएस पक्षात आल्या तर आम्ही त्यांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री करू. अशी ऑफर बीआरएस पक्षाच्या महाराष्ट्र समन्वयकांनी दिली आहे. या ऑफरवर आता राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. यावर आता शिवसेनेच्या ठाकरे गटाची प्रतिक्रिया आली आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काही वेळापूर्वी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बातचित केली. यावेळी दानवे यांना पंकजा मुंडे यांना आलेल्या ऑफरविषयी विचारण्यात आलं. पंकजा मुंडे ही ऑफर स्वीकारून बीआरएसमध्ये जातील का? किंवा त्यांच्या जाण्याने बीआरएस पक्षाची महाराष्ट्रातील स्थिती सुधारेल का? असे प्रश्न दानवे यांना विचारण्यात आले. यावर दानवे यांनी स्पष्ट उत्तर दिलं. अंबादास दानवे म्हणाले, पंकजा मुंडे या महाराष्ट्रातील भाजपाच्या मोठ्या नेत्या आहेत.

---

## जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर गॅस टँकरचा अपघात, वायूगळतीची भीती

। पिंपरी । महाईन्यूज

काही दिवसांपूर्वी खंडाळा घाटात ऑईल टँकर रस्त्यावर उलटा होऊन त्यातील ऑईलने पेट घेऊन त्यात पाच जणांना होरपळून मृत्यू झाला होता. त्यात एकच कुटुंबातील तिघांचा समावेश होता. ती घटना ताजी असतानाच आता जुन्या मुंबई - पुणे महामार्गावर निगडी परिसरात गॅस टँकर उलटला आहे.

टँकर मधील गॅस बाहेर आल्यास आग लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही घटना घडली. असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. भारत गॅस कंपनीचा हा टँकर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून पोलिसांकडून कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुंबईहून पुण्याच्या दिशेने येत



असलेला हा गॅस टँकर पहाटेची वेळ असल्याने वेगात होता. निगडी परिसरात आल्यावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टँकर रस्त्यावर आडवा होता. टँकर दुभाजकाला घासत रस्त्यावर आडवा झाला. या दुर्घटनेत मनुष्यहानी झाली नसल्याची माहिती समोर येत असली तरी वायू गळतीमुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेची वर्दी मिळताच अग्निशमन दल देखील घटनास्थळी दखल झाले असून रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

## “सत्तेसाठी आधीच हिंदुत्व खुंटीला टांगलं होतं

## » एकनाथ शिंदेंचं उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र

। पाटणा । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रातील सत्ताधारी भाजपाविरोधात बिहारची राजधानी पाटण्यात १५ विरोधी पक्षांची शुक्रवारी ( २३ जून ) महाबैठक झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेही या बैठकीला उपस्थित होते. यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे.**

**“सत्तेसाठी आधीच हिंदुत्व खुंटीला टांगले होते, काल पाटणा येथे जाऊन ते वेशीवर टांगले,” अशी टीका एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.**

ट्वीट करत एकनाथ शिंदे म्हणाले, “मुख्यमंत्री असताना फक्त दोन वेळा मंत्रालयात गेलेले काल सत्तेच्या लालसेने थेट पाटण्याला पोहोचले. सत्तेसाठी आधीच हिंदुत्व खुंटीला टांगले होते, काल पाटणा येथे जाऊन ते वेशीवर टांगले. केवळ आणि केवळ मोदींना विरोध करण्यासाठी एकत्र आलेल्या लोकांची आघाडी होणार नाही. झाली तरी या स्वार्थी आघाडीला लोक स्वीकारणार नाहीत.”

“सत्तेसाठी शिवसेना पक्ष, बाळासाहेबांचे विचार गहाण ठेवणाऱ्यांच्या विरोधात आम्ही एक वर्षापूर्वी उठाव केला. कालच्या बैठकीमुळे आमची भूमिका किती योग्य होती, हेच पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. बाळासाहेबांनी ज्या काँग्रेस, राजद, पीडीपी, राष्ट्रवादी काँग्रेस, जेडीयू यांच्यावर कायम सडकून टीका केली होती, त्याच लोकांच्या टोळीत हे सामील झाले आहेत. याच लोकांनी हिंदुत्वाला, राम मंदिर उभारणीला आणि कलम ३७० रद्द करण्याला कडाडून विरोध केला होता, हे विसरून त्यांचेच उंबरे हे झिजवत आहेत. ३७० कलमाचे समर्थन



करणाऱ्या मेहबुबा मुफ्ती यांच्या शेजारी बसून एकोप्याच्या गप्पा करत आहेत,” असा हल्लाबोल एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर केला. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा द्वेष हा या सर्व विरोधकांचा एक कलमी कार्यक्रम आहे. हिंमत असेल तर त्यांनी आघाडीचा नेता जाहीर करावा. पण तसे होणार नाही. कारण प्रत्येकजण पंतप्रधान होण्याची स्वप्न पाहात आहे,” असेही एकनाथ शिंदेंनी म्हटलं. “आत्मविश्वास गमावलेल्या या सर्व नेत्यांच्या चेहऱ्यावर नैराश्यच दिसत होते. मोदींचा पराभव करण्यासाठी १५ पक्ष एकत्र येत आहेत. हाच मोदींच्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा विजय आहे. केवळ स्वार्थासाठी एकत्र आलेल्यांना २०२४ च्या निवडणुकीत जनता त्यांची जागा दाखवून देईल,” असे एकनाथ शिंदे म्हणाले. “कालच्या बैठकीत चारा घोटाळ्यात गजाआड गेलेल्या लालूप्रसाद यादव यांच्या मांडीला मांडी लाऊन बसलेले लोक आता मुंबईतल्या भ्रष्टाचाराची आवई उठवून १ जुलै रोजी मोर्चा काढणार आहेत.



# डायमंड रिंगसाठी शहनाज गिल चर्चेत

बिग बॉस 13 ची स्पर्धक शहनाज गिल सध्या तिच्या नवीन म्युझिक अल्बममुळे चर्चेत आहे. गुरु रंधावासोबत अभिनेत्रीचा 'मून राइज' नावाचा म्युझिक अल्बम रिलीज झाला, ज्याला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळत आहे. याशिवाय अभिनेत्री 'देसी वाइब्स विथ शहनाज गिल'मुळेही चर्चेत आहे.
शहनाज गिलच्या या शोमध्ये आतापर्यंत अनेक सेलिब्रिटी दिसले आहेत. अलीकडेच अभिनेत्री रकुल प्रीत सिंग इस्तेमा या शोचा एक भाग बनली होती. शहनाजने रकुलला अनेक गोष्टी विचारल्या. या शोमध्ये दोन्ही अभिनेत्रींनी खूप धमाल केली. यादरम्यान रकुलने शहनाजशी काही अडल्ट विषयांवर मोकळेपणाने बोलले.देसी वाइब्सच्या लेटेस्ट एपिसोडमध्ये, रकुल प्रीत सिंग तिच्या नवीनतम रिलीज 'छत्रीवाली' च्या प्रमोशनसाठी आली होती. यादरम्यान तिला शहनाज गिलच्या हातात हिऱ्याची अंगठी दिसली. रकुल म्हणाली की तिची हिऱ्याची अंगठी खूप सुंदर आहे पण ती चुकीच्या बोटात घातली आहे. या बोटासाठी तुझ्यासाठी हिऱ्याची अंगठी कोणी विकत घेतली नाही असे रकुलने विचारले.
रकुलच्या प्रश्नाला मजेशीर उत्तर देताना शहनाज गिल म्हणाली की, ती सध्या रिलेशनशिपमध्ये नाही. गप्पा मारताना शहनाजने असेही सांगितले की, तिने स्वत: ही अंगठी खरेदी केली आहे आणि ती स्वतःला गिफ्ट केली आहे.शहजान गिल लवकरच सलमान खानसोबत मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. तिचा 'किसी का भाई किसी की जान' हा चित्रपट 21 एप्रिल 2023 रोजी प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात अब्दु रोजिक देखील असल्याची चर्चा आहे.



# कंगना रणौतची इमर्जन्सीच्या प्रदर्शनाबाबत मोठी घोषणा

मुंबई : कंगना रणौत हिची निर्मिती आणि दिग्दर्शन असलेल्या इमर्जन्सी सिनेमाची सर्वांना उत्सुकता लागली आहे. या सिनेमात कंगनानं इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. या सिनेमातील कंगनाचा लुक पाहून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. त्याचबरोबर या सिनेमा पाहण्याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. आता या सिनेमाच्या प्रदर्शनाबाबतची मोठी घोषणा कंगनानं आज केली आहे. कंगना रणौतनं तिच्या निर्मिती संस्थेच्या युट्यूबवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये कंगनानं सांगितलं आहे की इमर्जन्सी हा सिनेमा २४ नोव्हेंबर २०२३ ला प्रदर्शित होणार आहे. या व्हिडिओमध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणिबाणी लागू केल्याच्या घटनेला ४८ वर्षे झाल्याचा उल्लेख केला आहे. या सिनेमात इंदिरा गांधी यांची ही भूमिका कंगना रणौत हिनं साकारली आहे. तिचा पहिला लुक जेव्हा समोर आला तेव्हा सर्वांन तिचं भरभरून कौतुक केलं आहे. त्याचबरोबर सिनेमाच्या टीझरमध्ये त्यातील पात्रांच्या तोंडी जे संवाद दिले आहेत ते ही दमदार आहेत.

# 'जरा हटके...' ला सुगीचे दिवस

'जरा हटके जरा बचके' हा चित्रपट प्रदर्शित होऊन २३ दिवस झाले आहेत. चित्रपटगृहांमध्ये अजूनही तो कायम चालू आहे. प्रभास आणि क्रिती सेनॉन यांचा 'आदिपुरुष' पहिल्या आठवड्यातच गंडला, मात्र सारा अली खान आणि विकी कौशल यांच्या चित्रपटाची जादू अजूनही कायम आहे. २ जून रोजी प्रदर्शित झालेला 'जरा हटके जरा बचके' २२ व्या दिवशी 'आदिपुरुष'च्या तुलनेत थोडाच मागे राहिला आहे.

SACNILK च्या अहवालानुसार, जरा हटके जरा बचकेने २२ व्या दिवशी एकूण १.३५ कोटी रुपये जमा केले. यासह, भारतीय बॉक्स ऑफिसवर चित्रपटाचे एकूण कलेक्शन ७३.८९ कोटी रुपयांच्या जवळ पोहोचले आहे. त्याचबरोबर हा चित्रपट आता जगभरात १०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचला आहे. हा चित्रपट १०० कोटींचा टप्पा गाठण्यापासून फक्त २.३ कोटी दूर आहे. या चित्रपटाने जगभरात एकूण ९७.७० कोटींची कमाई केली आहे.

### 'जरा बचके जरा हटके'ची मोहिनी परतली

दुसरीकडे, या चित्रपटाच्या दोन आठवड्यांनंतर म्हणजेच १६ जून रोजी प्रदर्शित झालेल्या, ५०० कोटींहून अधिक बजेट असलेल्या 'आदिपुरुष'ने शुक्रवारी हिंदीत २.१५ कोटी रुपये कमावले. तर इतर सर्व भाषांमध्ये मिळून ३.४ कोटींची कमाई केली. रिलीज होण्यापूर्वीच्या आगाऊ बुकिंगमुळे चित्रपटाने पहिल्या तीन दिवसांत चांगला व्यवसाय केला होता. त्यामुळेच चित्रपटाने पहिल्या वीकेंडला चांगली सुरुवात केली. त्यानंतर चित्रपटाच्या कमाईत सातत्याने घसरण होत आहे. सारा आणि विकी कौशलच्या या चित्रपटाला या गोष्टीचा कुठेतरी फायदा मिळत आहे. 'आदिपुरुष' रिलीज झाल्याच्या १५ व्या दिवशी सारा आणि विकीच्या या चित्रपटाची कमाई कमी झाली होती. चित्रपटाने १५ व्या दिवशी १.०८ कोटी कमावले होते आणि आता २२ व्या दिवशी तो चांगला १.३५ कोटी रुपये कमावणारा ठरला.



'आदिपुरुष' 500 कोटींहून अधिक बजेटमध्ये बनला असताना, 'जरा हटके जरा बचके'चे बजेट ५० कोटींच्या आसपास आहे आणि कमाईच्या बाबतीत तो आता १०० कोटींच्या जवळपास पोहोचला आहे. 'जरा हटके जरा बचके' हा रोमँटिक-कॉमेडी चित्रपट असून त्यात एका मध्यमवर्गीय कुटुंबाची कथा दाखवली आहे.

# टीव्हीवरील लाडक्या सुनेला मिळाला दुसरा जन्म!

'कुमकुम - एक प्यारा सा बंधन' मध्ये कुमकुमची भूमिका साकारणारी अभिनेत्री जुही परमार बऱ्याच दिवसांपासून छोट्या पडद्यावरुन गायब आहे. पण नुकतेच जुहीने एका पॉडकास्टमध्ये आपल्याला दुसरे आयुष्य मिळाल्याचे सांगितले.

मुंबई- लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री जुही परमार 'कुमकुम - एक प्यारा सा बंधन' या मालिकेतील कुमकुमच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध आहे. जुहीने नुकतेच उघड केले की तिला दुसरे जीवन मिळाले आहे. काहीतरी खाल्ल्यामुळे तिला रुग्णालयात दाखल केले होते. त्यातून ती वाचली आणि त्या दिवसासाठी ती कायम कृतज्ञ आहे. २०१९ मध्ये एका रात्री तिच्या श्वसननलिकेत अन्न अडकले होते. 'द हॅबिट कोच विथ एशडिन डॉक्टर' या पॉडकास्टवर बोलताना जुहीने ही घटना शेअर केली. ज्यामुळे तिचे आयुष्य कायमचे बदलले.



जुही परमार म्हणाली, 'माझ्यासोबत एक खूप मोठी घटना घडली होती, जी मी इंस्टाग्रामवर शेअर केलेली. मी माझ्या या आयुष्याला माझे दुसरे जीवन म्हणते. कारण १९ मार्च २०१९ ला त्यावेळी होळीची रात्र होती. मी जवळजवळ मेले होते. मी आयसीयूमध्ये होते. माझ्या नाकात आणि श्वासनलिकेमध्ये अन्न अडकले होते आणि मला श्वास घेता येत नव्हता. ती खूप कठीण रात्र होती.

ती पुढे म्हणाली, 'पण त्या रात्री माझ्यात खूप बदल झाला. त्यासाठी मी सदैव ऋणी राहीन. त्या रात्रीने मला कायमचे बदलले. मी एक पुस्तक वाचत होते ज्यात लिहिलेले 'ठीक आहे, दररोज तुम्हाला बऱ्याच गोष्टी लिहाव्या लागतील ज्यासाठी तुम्ही कृतज्ञ आहात'. घर, करिअर, तब्येत यावर लिहिलं, आता अजून काय लिहू.

# सॅफ अजिंक्यपद स्पर्धेत नेपाळचा धुव्वा!

## भारतीय संघ उपांत्य फेरीत दाखल, नेपाळचा 2-0 असा पराभव केला

**। बेंगळुरू ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारतीय संघाने सलग दुसऱ्या विजयासह दक्षिण आशियाई फुटबॉल फेडरेशन (सॅफ) अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. भारतीय संघाने नेपाळचा २-० असा पराभव केला. भारताने या पूर्वी झालेल्या सामन्यात पाकिस्तानवर दमदार विजय मिळवला होता, त्यामुळे आता भारताचा उपांत्य फेरीचा मार्ग निश्चित झाला आहे.**



कंठीरव स्टेडियममध्ये हा सामना झाला. जागतिक क्रमवारीत भारत १०६व्या, तर नेपाळ १६८व्या क्रमांकावर आहे. यापूर्वी, या संघांतील लढतीत भारताने १६-२ असे वर्चस्व राखले होते; तसेच पाच लढती बरोबरीत सुटल्या होत्या. गेल्या सॅफ स्पर्धेत भारतीय संघाने नेपाळचा ३-२ असा पराभव केला होता. या वेळी तशाच कामगिरीसाठी भारतीय संघ उत्सुक होता. त्यातच भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ४-० ने धुव्वा उडवला होता. साहजिकच भारतीय संघाचा आत्मविश्वास दुणावलेला होता.

भारतीय संघात मोठे बदल करण्यात आले. पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या गेल्या सामन्यातील सुनील छेत्री, अनिरुद्ध थापा आणि साहल अब्दुल समद यांचाच 'स्टार्टिंग इलेव्हन'मध्ये समावेश होता. पूर्वार्धात नेपाळने कडवी झुंज दिली. त्यांनी उत्तम बचाव केला आणि वेगवान प्रतिआक्रमणेही रचली. पूर्वार्धात समदला गोल नोंदवण्याची संधी होती. मात्र, 'हेडर'द्वारे त्याने केलेला प्रयत्न अयशस्वी ठरला. चेंडू गोल पोस्टच्या बाजूने गेला. त्यानंतर, नेपाळला खाते उघडण्याची संधी मिळाली होती. मात्र, ३४व्या मिनिटाला रोहितकुमारने नेपाळच्या विमल घात्रीचा प्रयत्न हाणून पाडला. त्यानंतर, ४१व्या मिनिटाला महेशसिंगने समदला संधी निर्माण करून दिली होती.

### पूर्वार्धात सामना असाच होता

»पूर्वार्धात दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. हाफटाइमनंतर स्कोअर 0-0 असा बरोबरीत आहे. दोन्ही संघांनी पूर्वार्धात प्रत्येकी तीन शॉट्स घेतले. नेपाळचा एक फटका निशाण्यावर राहिला तर भारतीय संघाला लक्ष्यावर एकदाही चेंडू मारता आला नाही. ताब्याचा प्रश्न असेल तर टीम इंडिया यात पुढे आहे. त्याच्याकडे 65 टक्के वेळ चेंडू होता. दोन्ही संघांना प्रत्येकी एक कॉर्नरही मिळाला आहे, मात्र आतापर्यंत कोणीही आपले खाते उघडले नाही.

### उत्तरार्धात भारतीय संघ आक्रमक होता

»पूर्वार्धात अपेक्षेप्रमाणे खेळ न करणारा भारतीय संघ उत्तरार्धात पुनरागमन करत आला. या अर्ध्यामध्ये त्याने हल्ले सुरूच ठेवले. दुसऱ्या हाफमध्ये भारतीय खेळाडूंनी गोलचे 10 प्रयत्न केले. यातील पाच शॉट्स लक्ष्यावर होते. त्याचवेळी नेपाळ संघाने चार प्रयत्न केले, मात्र एकही फटका लक्ष्यावर ठेवता आला नाही. अत्यंत आक्रमकतेचा फायदा भारताला मिळाला आणि त्यांनी दोन गोल करत सामना जिंकला.

---

# चेतेश्वर पुजारासाठी टीम इंडियाचे दरवाजे कायमचे बंद झाले?

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवारी वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी कसोटी आणि एकदिवसीय संघांची घोषणा केली. या दोन्ही संघांमध्ये काही नवीन खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. दुसरीकडे चेतेश्वर पुजारा आणि उमेश यादव या सीनियर खेळाडूंना कसोटी संघातून वगळण्यात आले. त्यात पुजारा हे सर्वात मोठे नाव आहे. पुजाराचा फॉर्म गेल्या काही दिवसांपासून चांगला नाही.**



कौंटी क्रिकेटमध्ये तो धावा करत आहे, पण टीम इंडियासाठी त्याच्या बॅटमधून फारशा धावा निघालेल्या नाहीत. अशा स्थितीत निवड समितीने त्याला पुन्हा एकदा संघातून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. अशा स्थितीत पुजारा पुन्हा संघाबाहेर असताना क्रिकेटच्या वर्तुळात चर्चा रंगल्या होत्या की आता टीम इंडियाचे दरवाजे त्याच्यासाठी कायमचे बंद झाले आहेत का?

२०१२ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी भारतीय कसोटी संघात त्याचे स्थान निश्चित केल्यानंतर, पुजाराला २०१४-१५ बॉर्डर गावसकर ट्रॉफीमध्ये प्रथमच वगळण्यात आले. एक वर्षानंतर, विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली, त्याला वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेसाठी वगळण्यात आले. त्यावेळी कोहलीने पुजाराच्या स्ट्राईक रेटवर टीका केली. २०१८ मध्ये इंग्लंड दौऱ्यावरील पहिल्या सामन्यात पुजाराच्या जागी के.एल. राहुलला संधी देण्यात आली होती.

यानंतर पुजाराने पुनरागमन करत काही वर्षे दमदार कामगिरी केली. चौथ्यांदा पुजारा आणि रहाणे या दोघांनी संघातील स्थान गमावले. मात्र, कौंटी क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करत त्याने पुन्हा एकदा संघात स्थान मिळवले. मात्र या संधीचा फायदा पुजाराला करता आला नाही. बांगलादेशविरुद्ध ९० आणि १०२ धावांची खेळी वगळता गेल्या तीन वर्षांत त्याने २६च्या खराब सरासरीने धावा केल्या आहेत. बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न छापण्याच्या अटीवर पीटीआयला सांगितले की, "घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलिया मालिकेत अपयशी ठरल्यानंतर त्याच्यासाठी फार कमी संधी उरल्या होत्या, परंतु निवडकर्त्यांना WTC फायनलपूर्वी बदल करायचे नव्हते." ओव्हलवरील त्याच्या कामगिरीवरून हे सिद्ध झाले की आता त्याला संघात फार कमी संधी मिळतील. एस.एस. दास WTC फायनलसाठी लंडनमध्ये होते.

# जोस बटलरने मोडला रोहित शर्माचा मोठा विक्रम

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**सध्या इंग्लंडमध्ये टी-२० ब्लास्ट स्पर्धा खेळली जात आहे. या टूर्नामेंटमध्ये दररोज नवनवीन विक्रम रचले जात, तर काही विक्रम मोडले जात आहेत. दरम्यान, बुधवारी जोस बटलरच्या खेळीच्या जोरावर लँकेशायरने १५ षटकांत ४गडी गमावून १७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात डर्बीशायरला ७ गडी गमावून १५० धावाच करता आल्या. इंग्लंडच्या जोस बटलरने ८३ धावांची तुफानी खेळी करत भारतीय कर्णधार रोहित शर्माचा एक मोठा विक्रम मोडला आहे. यासोबतच त्याने मोठी कामगिरीही केली आहे. बटलरने तुफानी खेळी खेळली.**



शुक्रवारी रात्री लँकेशायरकडून खेळणाऱ्या जोस बटलरने डर्बीशायरविरुद्ध अवघ्या ३९ चेंडूत ८३ धावांची तुफानी खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून ८ चौकार आणि ६ षटकार निघाले. सुरुवातीपासूनच बटलरने गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले आणि मैदानाच्या प्रत्येक दिशेला मोठे फटके खेळले. जोस बटरलरने ८३ धावांच्या खेळीसह टी-२० क्रिकेटमध्ये १०,००० धावा पूर्ण केल्या. या फॉरमॅटमध्ये अशी कामगिरी करणारा तो जगातील नववा क्रिकेटपटू ठरला आहे. त्याने ब्रेंडन मॅक्क्युलमला मागे टाकले आहे. मॅक्युलमच्या नावावर टी-२० क्रिकेटमध्ये ९९२२ धावा आहेत. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०,००० धावा पूर्ण करण्यात जोस बटलरने रोहित शर्माला मागे टाकले आहे. रोहित शर्माला टी-२० मध्ये हा आकडा गाठण्यासाठी ३६२ डाव खेळावे लागले. जोस बटलरने आता त्याला मागे सोडले आहे. यासोबतच तो टी-२० मध्ये सर्वात जलद १०,००० धावा पूर्ण करणारा इंग्लंडचा पहिला क्रिकेटर बनला आहे.

**टी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू –**

१. ख्रिस गेल – १४५६२ धावा
२. शोएब मलिक – १२५२८ धावा
३. किरॉन पोलार्ड – १२१७५ धावा
४. विराट कोहली – ११९६५ धावा
५. डेव्हिड वॉर्नर – ११६९५ धावा
६. आरोन फिंच – ११३९२ धावा
७. ॲलेक्स हेल्स – ११२१४ धावा
८. रोहित शर्मा – ११०३५ धावा
९. जोस बटलर – १००८० धावा.